पवित्र पोर्टलमार्फत शिक्षक पदभरतीच्या कार्यपध्दतीमध्ये आवश्यक सुधारणा करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण- २०२५/प्र.क्र. ९३३ (१)/टीएनटी-१**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
**दिनांक: २० जानेवारी, २०२६.**

वाचा :

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. पीआरई-१७१३/(८६/१३)/ प्राशि-५, दि. १९.०६.२०१३.
२. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. सीईटी-२०१५/प्र.क्र. १४९/ टीएनटी-१, दि. ०७.०२.२०१९.
३. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र. १०६/ टीएनटी-१, दि. १०.११.२०२२.
४. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र. ५०९/ टीएनटी-१, दि. १३.१०.२०२३.

प्रस्तावना :

पवित्र पोर्टलमार्फत शिक्षक पदभरतीची कार्यपध्दती संदर्भ क्र. १ ते ४ येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली आहे. यातील बहुतांशी तरतूदी पदभरतीची प्रक्रिया अधिकाधिक सुलभ व पारदर्शक पध्दतीने पार पाडावी या हेतूने करण्यात आल्या होत्या. तथापि, काही तरतुदींमुळे पदभरतीच्या प्रक्रियेत अनावश्यक गुंतागुंत निर्माण झाली असल्याचे निदर्शनास आले आहे. ही बाब विचारात घेऊन संबंधित काही तरतूदी अधिक्रमित करुन सुधारित तरतूदी लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

खालील तक्त्यात दर्शविण्यात आल्याप्रमाणे पवित्र पोर्टलमार्फत शिक्षक पदभरतीच्या कार्यपध्दतीशी संबंधित तरतूदी अधिक्रमित करण्यास व त्याऐवजी सुधारित तरतूदी लागू करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | संबंधित शासन निर्णय | अधिक्रमित करावयाची विद्यमान तरतूद | लागू करावयाची सुधारित तरतूद |
|---|---|---|---|
| १. | शासन निर्णय, दि. १३.१०.२०२३ मधील परिच्छेद क्र. २ | विविध टप्प्यांमध्ये जाहिराती येणार असल्याने उमेदवाराची एकदा निवड झाल्यानंतर असा उमेदवार पुन्हा नव्याने येणाऱ्या जाहिरातीनुसार त्याने अर्ज केल्यास निवडीसाठी | उमेदवाराचे चालू चाचणी परीक्षेतील गुण मुलाखतीशिवाय व मुलाखतीसह या निवडीच्या प्रकारासाठी मिळून केवळ एक वेळ निवडीच्या शिफारशीसाठीच लागू राहतील. उमेदवारास निवड प्रक्रियेत पुन्हा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | याच गुणवत्तेनुसार पूर्वी शिफारस झालेल्या गटापेक्षा वरच्या गटातील अर्हतेनुसार पदांसाठी पात्र राहील. उमेदवारास पुर्वी निवड झालेल्या त्याच गटासाठी अर्ज करावयाचा झाल्यास नव्याने चाचणी परीक्षा दिल्यानंतर गुणवत्तेनुसार पुन्हा त्याच गटासाठी पात्र ठरेल. | सहभागी व्हावयाचे असल्यास त्यास नव्याने चाचणी परीक्षा द्यावी लागेल. |
| २. | शासन निर्णय, दि. ०७.०२.२०१९ मधील परिच्छेद ५.७ | इच्छुक व अर्हताप्राप्त उमेदवार जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून आपल्या अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणीमध्ये पात्र गुणांसह पवित्र प्रणालीवर ऑनलाईन सात दिवसाच्या आत अर्ज करतील. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थामधील व खाजगी शिक्षण संस्थांमधील शिक्षण सेवकांच्या रिक्त पदासाठी स्वतंत्र प्राधान्यक्रम देतील. उमेदवार अर्जामध्ये प्रवर्ग व विषय यांचा विचार करुन प्राधान्यक्रम देऊ शकतील. उमेदवारांना स्थानिक स्वराज्य संस्थांमधील व खाजगी शैक्षणिक संस्थांमधील रिक्त जागांसाठी उपलब्ध असलेल्या सर्व रिक्त जागांसाठी पात्रतेनुसार प्राधान्यक्रम देता येतील. | इच्छुक व अर्हताप्राप्त उमेदवार जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून आपल्या अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणीमध्ये पात्र गुणांसह पवित्र प्रणालीवर सुविधा दिलेल्या कालावधीत अर्ज करतील. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थामधील व खाजगी शिक्षण संस्थांमधील शिक्षण सेवकांच्या रिक्त पदासाठी स्वतंत्र प्राधान्यक्रम देतील. उमेदवार अर्जामध्ये प्रवर्ग व विषय यांचा विचार करुन प्राधान्यक्रम देऊ शकतील.<br>उमेदवारांना त्यांच्या अर्हतेनुसार मुलाखतीशिवाय व मुलाखतीसह या निवडीच्या दोन्ही प्रकारासाठी जाहिरातीतील पात्र असलेले सर्व प्राधान्यक्रम उपलब्ध होतील. **तथापि, उमेदवारास त्याच्या सोईनुसार त्यापैकी जास्तीत जास्त एकूण ५० प्राधान्यक्रम लॉक करता येतील.** सदर मर्यादा निवडीच्या दोन्ही प्रकारांसाठी स्वतंत्रपणे असेल. |
| ३. | शासन निर्णय, दि. १०.११.२०२२ मधील परिच्छेद ३.१ | शिक्षक पदभरतीसाठी व्यवस्थापनाने प्रसिध्द केलेल्या जाहिरातीच्या दिनांकास असलेले | पदभरती ज्या शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी मधील प्राप्त गुणांच्या आधारे करण्यात येत आहे, त्या **चाचणीसाठी अर्ज करण्याच्या** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | उमेदवाराचे वय विचारात घेण्यात येईल. तथापि, सन २०२२ मध्ये होणाऱ्या शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणीनुसार येणाऱ्या जाहिरातीसाठी उमेदवारांचे वय कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर २ वर्षासाठी शिथिलक्षम करण्यात येत आहे. | **शेवटच्या दिनांकास उमेदवाराच्या वयाची परिगणना करण्यात येईल.** |
| ४. | शासन निर्णय, दि. १९.०६.२०१३ मधील परिच्छेद १ (३) | बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदीनुसार प्राथमिक शिक्षकांकरीता (इ. १ ली ते ८ वी) शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्य करण्याबाबत निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक- आरटीई-२०१०/प्र.क्र. ५७२/प्राशि-१, दि. १३ फेब्रुवारी, २०१३ मधील तरतुदीनुसारच सेमी इंग्रजी अध्यापन शिक्षण पध्दती अवलंबिणाऱ्या शाळांमधील शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्य राहील. तसेच, संबंधित शाळेकरीता मंजूर शिक्षकांपैकी किमान एक शिक्षक इंग्रजी माध्यमातून शिक्षणशास्त्रातील पदविका (डी.टी.एड.) धारक असणे आवश्यक राहील. | बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदीनुसार प्राथमिक शिक्षकांकरीता (इ. १ ली ते ८ वी) शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्य करण्याबाबत निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक- आरटीई-२०१०/प्र.क्र. ५७२/प्राशि-१, दि. १३ फेब्रुवारी, २०१३ मधील तरतुदीनुसारच सेमी इंग्रजी अध्यापन शिक्षण पध्दती अवलंबिणाऱ्या शाळांमधील शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्य राहील.<br>इयत्ता १ ली ते ५ वी, इयत्ता ६ वी ८ वी व इयत्ता ९ वी १० वी या गटांसाठी त्या त्या माध्यमांच्या शाळांकरीता शिक्षक उपलब्ध करुन देतांना व्यावसायिक अर्हता इंग्रजी माध्यमांसह त्या त्या शाळांचे माध्यम जसे की, मराठी, उूर्द, कन्नड इत्यादी विचारात घेऊन उमेदवारांनी शालांत परीक्षा ज्या माध्यमातून उत्तीर्ण केली आहे त्या माध्यमाच्या शाळेसाठी त्याची उमेदवारी विचारात घेण्यात यावी. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | इयत्ता १ ली ते ५ वी या गटासाठी सेमी इंग्रजी विषयांकरीता व्यावसायिक अर्हता इंग्रजी माध्यमातून पूर्ण करण्याची अर्हता निश्चित करण्यात आली आहे. त्या त्या सामाजिक प्रवर्गासाठी असे उमेदवार उपलब्ध न झाल्यास अशा रिक्त राहणाऱ्या पदांसाठी नव्याने जाहिराती देऊन या उमेदवारांसह ज्या उमेदवारांनी व्यावसायिक अर्हता इंग्रजी माध्यमातून पूर्ण केली नाही, मात्र १२ वी विज्ञान किंवा बी.ए./एम.ए. इंग्रजी किंवा बी.एस्सी/एम.एस्सी अशी अर्हता धारण केली आहे अशा उमेदवारांना पात्र समजण्यास मुभा देण्यात येत आहे. |

२. उपरोक्त बदल हे शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी-२०२५ नुसार करावयाच्या पदभरतीसंदर्भातील स्विकारण्यात येणाऱ्या सर्व टप्प्यातील जाहिरातींसाठी, तसेच त्यानंतर होणाऱ्या शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी नुसार करावयाच्या पदभरतीसाठी लागू राहतील.

३. संदर्भ क्र. १ ते ४ येथील शासन निर्णयातील तरतूदी तसेच या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आलेल्या सुधारित तरतूदी ह्या पवित्र पोर्टलमार्फत शिक्षक पदभरती करु इच्छिणाऱ्या अन्य प्रशासकीय विभागांच्या पदभरतीसाठी देखील लागू राहतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०२६०१२०१२३९०२९५२१** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by ABASAHEB ATMARAM KAWALE
Date: 2026.01.20 12:40:33 +05'30'

(आबासाहेब कवळे)

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास / वित्त) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५) मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

७) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
८) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
९) मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०) मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११) मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य (सर्व)
१२) मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
१३) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६) शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक/योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे
१७) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
१८) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१९) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक/योजना)
२०) सर्व गट शिक्षणाधिकारी
२१) राज्यातील सर्व खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित शाळांचे मुख्याध्यापक व सबंधित व्यवस्थापनाचे अध्यक्ष/सचिव
२२) निवड नस्ती- टीएनटी-१